N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण **P.S.(ठाणे):** लोणी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0102 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 02:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 10/04/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/04/2023
**Time From (वेळेपासून):** 17:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/04/2023 **Time (वेळ):** 02:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2023 02:12 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माहूली जामगाव फटा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): तेजस प्रदिपराव शिरभाते

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | संताजी चौक वलगाव,लोणी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | वर्तमान पता | संताजी चौक वलगाव,बळगांव,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | संताजी चौक वलगाव,बळगांव,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण मत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती बबिता संजय खानंदे | | | 1. जामगाव,तानांदगाव खंजिअमरावत,लोणी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्री.पंकज हरिदास तालन | | | 1. नांदगाव खंजिअमरावती,लोणी, अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10000 | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

10,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी तेजस प्रदिपराव शिरभाते, वय-30वर्श, धंदा-षासकीय कंत्राटदार,रा.संताजी चौक वलगाव, ता. जि. अमरावती मो.क्र. 9730049955

मी समक्ष ॲन्टी करप्षन ब्युरो, अमरावती कार्यालयात हजर असून, मी वर नमुदप्रमाणे असुन, मी दि. 10/04/23 रोजी ॲन्टी करप्षन ब्युरो अमरावती येथील पो.नि.श्री.सतिष उमरे यांची भेट घेवून माझे तक्रारीबाबत माहिती दिली. त्यावरुन पो.नि.उमरे साहेबांनी प्रवर अधिक्षक, भारतीय डाक विभाग अमरावती येथे पत्र देवून पंच क्र. 1 श्री.संदिप आमले व पंच क्र.2 रत्नेष इंगोले यांना उपलब्ध करुन घेतले व त्यांनी माझा परिचय दोन्ही पंचांना करुन देवून,पंचांचा व ला.प्र.वि.कार्यालय, अमरावती येथील स्टाफचा परिचय मला करुन दिला.त्यावेळी मी त्यांना माझी लेखी तक्रार दाखविली व ती तक्रार सर्वासमक्ष थोडक्यात तोंडी सांगीतली. '' मी तेजस प्रदिपराव षिरभाते, मी षासकीय कंत्राटदार म्हणून षासनाचे विविध बांधकाम चे कंत्राट घेत असतो. मी ग्रामपंचायत जामगाव,ता.नांदगाव खंडेष्वर,जि.अमरावती अंतर्गत जलजिवन मिषन अंतर्गत पाणी पुरवठा जामठी येथील पाईपलाईनचे काम सन 2022 मध्ये घेतले होते. सदरचे काम पुर्ण झाले असून, मी केलेल्या कामाची पुर्ण रक्कम ही अंदाजे 5,00,000/-रू.पर्यन्त होत असून,आज पर्यन्त मला अंदाजे 3,89,000/-रु.चे बिल भेटले आहे.माझे अंदाजे 1,00,000/-रू.चे बिल थकीत आहे व जोपर्यंत सदरचे काम ग्रामपंचायत जामगावला हस्तांतरीत होत नाही तोपर्यंत माझे उर्वरित बिल मला भेटणार नसल्याने, मी सदरबाबत उपविभागीय अभियंता,ग्रामीण पाणीपुरवठा,उपविभाग क्र.1,जि.प.अमरावती यांना भेटलो असता, त्यांनी हस्तांतरण फार्मवर सही करून माझेकडे दिले व त्यावर संरपच व सचिव, ग्रामपंचायत, जामगाव यांचे सही घेवून येणेबाबत संगीतले.

त्यांनतर मी दि.03/04/2023 रोजी ग्रामपंचायत जामगाव येथील सरपंच श्रीमती खांनदे मॅडम यांना माझे थकीत बिल निघणे कामी हस्तातरण फार्मवर सही करून देणे बाबत अर्ज देवून भेटलो असता, त्यांनी मला हस्तांतरण फॉम वर सही करून देण्यासाठी 10,000/-रु.लागतील असे सांगीतले. त्यावरुन मी त्यांना ठिक आहे असे म्हणून निघून आलो.

परंतू मला सरपंच श्रीमती खांनदे मॅडम यांना 10,000/-रु.लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने, त्यांचेवर कायदेषीर कार्यवाही करीता आपणाकडे तक्रार देत आहे. ग्रामपंचायत जामगाव, ता.नांदगाव खं,जि.अमरावती येथील सरपंच श्रीमती खांनदे मॅडम यांचे सोबत माझा कोणताही आर्थिक व्यवहार नसुन, त्यांच्याषी माझा कोणत्याही प्रकारचा वाद नाही.अषी सविस्तर लेखी तक्रार दिली.त्यानंतर पो.नि.सतिष उमरे यांनी मला व दोन्ही पंचांना महत्वाच्या सुचना देवून पडताळणीपुर्व पंचनामा कार्यवाही करण्यात आली.

त्यानंतर आम्ही सर्वजण जामगाव करिता रवाना झालो.जामगाव फाटयाजवळ पोहचल्यानंतर आम्ही सर्वजन अमरावती-यवतमाळ रोडने एका निर्जनस्थळी थांबलो.त्यांनतर पोनि.उमरे यांनी मला व पंचाना पडताळणीपुर्व पंचनामातील सुचनांची उजळणी करून देवून,माझेजवळ डिजीटल व्हाईस रेकॉर्डर देवून पंच क्र.1 श्री.संदिप आमले यांचेसह जामगाव येथे दुचाकी वाहनाने गेलो. तेथे पोहचल्यानंतर मी व पंच क्र.1 श्री.आमले असे सरपंच श्रीमती खानंदे मॅडम यांची भेट घेण्याकरीता त्यांचे घरी गेलो. त्यावेळेस त्या घरी हजर होत्या. त्यावेळी मी श्रीमती.खानंदे यांना माझे अर्जाप्रमाणे मी केलेले कामाचे हस्तातरण फार्मवर सही करून देण्यांबाबत विचारपूस केली असता, सरपंच श्रीमती खानंदे मला म्हणाल्या की, "मी संगीतले प्रमाणे करा.त्यांनतर मी फार्मवर सही करून देते असे म्हणून, पंकजला सर्व सांगीतले आहे. पंकज सोबत बोलून घ्या असे सांगून,त्यांनी पंकज ला फोन करून, मी इकडे आलोय याबाबत सांगीतले" व फोन माझेकडे दिला.त्यावेळी मी श्री.पंकज तालन यांना सरपंच श्री.खानंदे यांचे घरी येण्यास

सांगीतलेनंतर,श्री.पंकज तालन हे त्यांचे घरी आले. त्यावेळी श्री.पंकज तालन यांनी मला हस्तातंरण फार्मवर सही देण्याकरिता, यापुर्वी जेवढे बोलणे झाले आहे, तेवढे दयावेच लागतील" व सही घेवून देण्याची जबाबदारी माझी असे म्हणाला.त्यावर मी त्यांना " 10,000/-रू.पेक्षा कमी करा,मी यावेळी 5000/-रू.देतो, माझे नेहमीच काम पडते. " असे म्हणालो असता, त्यावेळी सरपंच श्रीमती खानंदे यांनी मला पकंज जसे म्हणतोय तसे करा व त्या असे म्हणून पंकज याचे बोलण्यास सहमती दिली. त्यानंतर मी त्यांचेसोबत काहीवेळ माझे कामाबाबत चर्चा केली व त्यांना पैसे देण्यासाठी काही वेळ मागून,मी व पंच तेथून निघुन आलो.त्यानंतर आम्ही तेथून दुचाकीने पोनि.उमरे व पथक जेथे थांबलेत त्या ठिकाणी परत आलो असता पोना/राठोड यांनी पंचासमक्ष माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. अशाप्रकारे जामगाव येथील सरपंच श्रीमती खानंदे व ग्रामपंचायत सदस्य श्री.पंकज तालन यांनी मला मी जलजीवन मिषन अंतर्गत केलेले पाणीपुरवठा योजनेचे हस्तांतरण फॉर्मवर सही करण्यासाठी 10,000/-रु.लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे व लाच रक्कम ग्रामपंचायम सदस्य श्री.पकंज तालन यांचेकडे देणे असल्याचे निश्पन्न झाले. सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामाची कार्यवाही करण्यात आली.

त्यानंतर पो.नि.उमरे यांनी आम्हाला लागलीच सापळापुर्व कारवाई करण्याचे सागंुन, मला सरपंच श्रीमती खानंदे व ग्रामपंचायत सदस्य श्री.पकंज तालन यांना देण्याकरीता 10,000/-रु.लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी माझेकडील 500/-रू. दराच्या 20 नोटा हजर केल्या. त्यावेळी पंच क्र.2 श्री.इंगोले यांनी त्या नोटा घेतल्या व त्यांचे नंबर कागदावर लिहले, त्यावेळी पोनि.उमरे यांनी सांगीतले की, आता सदर नोटांना ॲथ्रासिन पावडर लावणार आहोत. त्यानंतर पोकॉ /आषिश जांभोळे यांनी आम्हाला ॲथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती देवून, नोटांना ॲथ्रासिन पावडर लावण्यात येवून मला व दोन्ही पंचांना सापळा कारवाई बाबत महत्वाच्या सुचना देण्यात आला.

त्यानंतर पोनि.उमरे यांनी मला व पंचांना सांगितले की,आता आपण माहूली चोर येथे जावुन जामगाव येथील ग्रामपंचायत संदस्य श्री.पंकज तालन यांचेविरुध्द सापळा आयोजित करणार आहोत. त्यानंतर पोना/राठोड यांनी नविन मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरमध्ये टाकून ते सुरु करुन माझे जवळ दिले व मी आणि पंच क्र.1 श्री.आमले असे दुचाकीने रवाना झालो व सोबतच सापळा कारवाईतील सर्व सदस्यही षासकीय वाहनाने माहूली चोर कडे निघालो. रस्त्यामध्ये असताना मला पंकज तालन यांचा फोन आला व त्याने मला माहुली चोर ते जामगाव फाटयावर थांबण्यास सांगीतले. त्यावेळी मी व पंच क्र.1 आमले असे माहुली चोर ते जामगाव फाटयावर थांबलो असता काही वेळातच तेथे श्री.पंकज तालन हे आले, त्यावेळी त्यांनी हाताने ईषारा करून पैषाची मागणी केली. त्यावेळी मी माझेजवळील लाच रक्कम 10,000/-रू.श्री.पंकज तालन दिले व बोललो की," हे 10,000/रू. आहे, पैसे मोजून घ्या, असे म्हणालो त्यावेळी त्यांनी पैसे मोजून घेतले व पैसे बरोबर असल्याचे सांगितले .त्यावेळी मी त्यांना संरपच मॅडमला फोन लावा असे म्हणालो, त्यावेळी श्री.पंकज तालन यांनी फोन लावला पण बोलणे झाले नाही.त्यानंतर मी लाच रक्कम स्विकारण्या बाबतचा नियोजित इषारा केला. त्यावेळी आजूबाजूला असलेले पो.नि.श्री.सतीष उमरे हे पथकासह आले व त्यांनी ग्रामपंचायत संदस्य श्री.तालन यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.ना.राठोड यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद केले.

त्यानंतर पो.नि.उमरे यांनी श्री.पंकज तालन यांना त्यांचा व सापळा पथकाचा परिचय देवून श्री.तालन यांनी माझेकडुन स्विकारलेली 10,000/-रु.लाच रक्कमे बाबत त्यांना विचारणा केली असता, त्यांनी सदर लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे खिषात ठेवले असलेबाबत सांगितले सदर लाच रक्कम पोनि.उमरे यांच्या सुचनेनुसार पंचानी ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि.उमरे यांनी ग्रा.पं.सदस्य पंकज तालन यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.पंकज हरिदास तालन, वय-33वर्शे,ग्रा.पं.सदस्य,रा.जामगाव,ता.नांदगाव खं.जि.अमरावती असे सांगीतले.त्यानंतर सापळा पथक संरपच श्रीमती बबिता खानंदे यांना ताब्यात घेवून ॲन्टी करप्षन ब्युरो, कार्यालय अमरावती येथे आलेत व उमरे साहेबांनी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा केला.

लोकसेवक श्रीमती बबिता संजय खानंदे, वय-43वर्शे, सरपंच,ग्रामपंचायत जामगाव,ता.नांदगाव खं.जि.अमरावती व श्री.पंकज हरिदास तालन, वय-33वर्शे, ग्रा.पं.सदस्य, ग्रा.पं.जामगाव,ता.नांदगाव खं.जि.अमरावती यांनी आपले पदाचा दुरुपयोग करून स्वतःचे आर्थीक फायदयासाठी पडताळणी कार्यवाही दरम्यान मी केलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाच्या अनुशंगाने सदरचे काम ग्रामपंचायत जामगाव ला हस्तांतरण करणेसाठीचे फार्मवर सही करण्यासाठी 10,000/-रू.लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान माझेकडून 10,000/-रु.लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले म्हणून त्यांचे विरुध्द माझी कायदेषिर फिर्याद आहे.

माझी वरिल प्रमाणे फिर्याद संगणकावर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढून मला दाखविली, सदर फिर्याद मी वाचुन पाहली असता घडलेल्या परिस्थितीप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MILINDKUMAR VINAYKUMAR DAWANE(SI (Sub-Inspector)) / 16501000362MVDM8901N — or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

FIR प्रत मीळाली [signature]

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

[signature] स्टे.डा.अमलदार पोलीस स्टेशन लोणी

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): MILINDKUMAR VINA'

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): 16501000362MVDM89(